

मृदुला सावंत
zeemarathidisha@dnaindia.net

# 'पॉश'चा खोटा आभास !

'एका प्रथितयश कंपनीला हायकोर्टद्वारे ५०,००० रुपयांचा दंड' हा मथळा पाहिला. उत्सुकतेने बातमी पुढे वाचल्यावर लक्षात आले, की कामाच्या ठिकाणी होणाऱ्या लैंगिक छळवणूक प्रतिबंधक कायद्यानुसार आवश्यक ती अंतर्गत समिती न स्थापन केल्याबद्दल हा दंड झाला होता. वाचल्यावर बातमीचे गांभीर्य अधोरेखित झाले. याच क्षेत्रात काम करत असल्यामुळे याआधीही अशा स्वरूपाच्या घटना वाचनात, पाहण्यात आल्या होत्या.

> 'कामाच्या ठिकाणी होणारी महिलांची लैंगिक छळवणूक प्रतिबंधक कायदा' कागदावर आहे, पण प्रत्यक्षात फार कमी ठिकाणी असतो. POSH कमिटी असते, पण ती यथातथाच!

२०१३ मध्ये 'कामाच्या ठिकाणी होणारी महिलांची लैंगिक छळवणूक प्रतिबंधक कायदा' पारित झाला. हा कायदा पारित होण्यामागे फार मोठी पार्श्वभूमी होती. या क्षेत्रात काम करणाऱ्या संघटनांकडे कामावर होणाऱ्या लैंगिक छळवणुकीसंदर्भात मोठ्या प्रमाणात आकडेवारी जमा झालेली होती. बऱ्याचशा केसेसमध्ये अशा पीडित स्त्रिया गप्प राहणं, दुर्लक्ष करणं, बदली करून घेणं अथवा अती झालं तर नोकरी सोडणं असे मार्ग अवलंबत असत. या समस्येला सर्वप्रथम वाचा फुटली ती मध्यप्रदेशमधील भवरीदेवी बलात्कार प्रकरणामुळे! कामाच्या ठिकाणी होणाऱ्या लैंगिक छळवणुकीला प्रतिबंध करण्याची मागणी त्यावेळी सर्वप्रथम न्यायालयाकडे केली गेली. न्यायालयानेही त्याची दाखल घेत विशाखा मार्गदर्शक तत्त्वे लागू केली. त्यानंतर दीर्घ प्रयत्नांनंतर सन २०१३ मध्ये हा कायदा पारित झाला.

या कायद्याद्वारे प्रथमच लैंगिक छळवणूक म्हणजे काय, 'कामाची जागा' कशाला म्हणावे, 'पीडित स्त्री' कोणाला म्हणावे, यांच्या व्याख्या केल्या गेल्या. अशा स्वरूपाच्या तक्रारी हाताळण्यासाठी कशा प्रकारची समिती असावी आणि तिचे कार्य कशा प्रकारे चालावे, या बाबतही स्पष्ट निर्देश दिले गेले. या सर्व कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षणही तज्ज्ञ व्यक्तीद्वारे केले जावे, असेही या कायद्यात नमूद करण्यात आले. एकंदरीत, या कायद्यातील तरतुदी लैंगिक छळवणुकीला प्रतिबंध करू शकतील अशाच आहेत.

हा कायदा पारित होऊन चार वर्षे झाल्यानंतरही या कायद्याची अंमलबजावणी अद्यापही समाधानकारक होत नाही, असे लक्षात आले आहे. अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्थेने विविध औद्योगिक वसाहतींना भेटी दिल्यावर काही गोष्टी ठळकपणे आढळल्या.



- १० कर्मचाऱ्यांपेक्षा जास्त कर्मचारी असणाऱ्या प्रत्येक आस्थापनामध्ये या कायद्याअंतर्गत एक समिती असणे बंधनकारक आहे. तरीही अद्याप बहुतांश आस्थापनांमध्ये अशा समितीचे गठण झालेले नाही.
- काही ठिकाणी समिती स्थापन केलेली आहे, परंतु ती नावापुरतीच असून योग्य रीतीने कार्यरत नाही.
- बऱ्याच कंपन्यांमध्ये अशी समिती अस्तित्वातच नाही, इतकेच नव्हे तर अशी समिती असणे बंधनकारक आहे, हे माहीतदेखील नाही.
- काही ठिकाणी, विशेषतः जरा मोठ्या कंपन्यांमध्ये, POSH कमिटी (Prevention of sexual harassment committee) या नावाने समित्या स्थापन झालेल्या आहेत, पण त्यामध्ये कायद्यातील तरतुदींची पूर्तता केलेली नाही. म्हणजे, समितीची प्रमुख महिला असावी, या समितीतील निम्मे सदस्य महिला असाव्यात, तसेच समितीत स्वयंसेवी संस्थेचा प्रतिनिधी असावा, या गोष्टींचा अभाव आढळतो.
- समिती आहे असे दाखवून कायद्याची पूर्तता केल्याचा आभास निर्माण केला जातो, असे अनेक ठिकाणी आढळले.
- कायद्यानुसार सर्व कर्मचाऱ्यांना तज्ज्ञांकडून प्रशिक्षण दिले जाणे अनिवार्य असले तरी या बाबतीतही प्रचंड अनास्था आढळून येत आहे. जिथे समितीच नाही, तिथे प्रशिक्षणाचा प्रश्नच उद्भवत नाही, परंतु जिथे समिती आहे अशा ठिकाणीदेखील कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण झालेले नाही, ही वस्तुस्थिती आहे.
- काही ठिकाणी ऑनलाईन प्रेझेन्टेशनद्वारे प्रशिक्षण केले जाते. मात्र अशा प्रेझेन्टेशनची अधिकृतता (authenticity) तपासण्याचे कोणतेही मानक ठरवण्यात आलेले नाहीत. तसेच, योग्य संदर्भासह कायद्यातील तरतुदी समजावल्या गेल्या नाहीत, तर त्या प्रशिक्षणाची उपयुक्तता बरीच कमी होते, हे लक्षात आले आहे.

'कामाच्या ठिकाणी होणारी महिलांची लैंगिक छळवणूक प्रतिबंधक कायदा' संदर्भात जागरुकता निर्माण करण्याची गरज ओळखून अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्थेने या क्षेत्रात काम करायचे ठरवले आहे. अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था गेली नऊ दशके महाराष्ट्रात व देशांत विविध क्षेत्रांत प्रशिक्षण देण्याचे काम सातत्याने करत आहे. आतापर्यंत महापालिकेचे नवनिर्वाचित नगरसेवक, नगरपरिषदांचे सदस्य, तसेच महापालिकांच्या व शासनाच्या विविध खात्यांतील अधिकारीवर्गाचे प्रशिक्षण देशभरात ही संस्था यशस्वीपणे करत आहे. अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्थेद्वारे इतरही अनेक अभ्यासक्रम व सामाजिक दृष्टिकोनातून उपयुक्त उपक्रम हाती घेण्यात येतात.

आता विविध कंपन्या व औद्योगिक वसाहतींमध्ये तसेच इतर आस्थापनांमध्ये जाऊन 'कामाच्या ठिकाणी होणारी महिलांची लैंगिक छळवणूक प्रतिबंधक कायदा' समजावणारे प्रशिक्षणवर्ग व कार्यशाळा घेण्याचे ठरवले आहे. तसेच, ज्या आस्थापनांमध्ये अंतर्गत तक्रारनिवारण समिती स्थापन झालेली नाही, त्यांना अशी समिती स्थापन करण्यासाठी मार्गदर्शन करणे आणि स्थापन झालेल्या समितीला योग्य रीतीने कार्यरत राहण्यासाठी सर्वतोपरी मदत करणे, असे या प्रकल्पाचे एकंदरीत स्वरूप असेल. न्यायालय किंवा पोलिस स्टेशनला न जाता अमलात आणला जाऊ शकतो असा हा कायदा आहे. त्याची अंमलबजावणी योग्य रीतीने व सर्वत्र व्हावी आणि कामाच्या जागी महिलांना लैंगिक छळवणुकीला सामोरे जावे लागू नये, त्यांना आदराची, सभ्यतेची वागणूक मिळावी, असे वातावरण प्रत्येक ठिकाणी असणे आवश्यक आहे. त्यासाठी जाणीव-जागृतीचे काम झाले पाहिजे.

(लेखिका समुपदेशक आहेत)

तुमचे मधुर पेय कोणी नाकारणार नाही; परंतु आयुष्याचे कडू घोट तुम्हाला एकट्यानेच प्यावे लागतील. – एला व्हीलर विल्कॉक्स